वृक्षतोडीच्या हायकोर्टाच्या निर्देशांना पालिकेच्या वाटाण्याच्या अक्षता

खासगी कंत्राटदारांना पाच वर्षे वृक्षतोडीचे काम

प्राधिकरणाची परवानगी न घेताच झाडांची कत्तल

उच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी) – वृक्षतोडी संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांना वाटाण्याच्या अक्षता लावत मुंबई महानगरपालिकेने खाजगी संस्थांना वृक्षतोड करण्याची परवानगी दिली आहे. या संस्थाकडून मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाची परवानगी न घेताच, मुंबईत सर्रासपणे झाडांची कत्तल होत असल्याचा आरोप करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते झोरु भटेना यांनी दाखल केलेल्या या याचिकेची न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेऊन याचिकेची सुनावणी १२ जून रोजी निश्चित केली आहे.

वृक्षतोडी संदर्भात उच्च न्यायालयाने दोन महिन्यापूर्वी पालिका प्रशासनाला निर्देश देताना वृक्षप्राधिकरणाची परवानगी घेण्याचे बंधन घातले होते. मात्र महापालिकेने मुंबईत अनेक ठिकाणी वृक्षांच्या फांद्या तोडाण्यासाठी ९ खाजगी संस्थाना वृक्षतोड करण्याची परवानगी दिली गेली.

फांद्या तोडण्याच्या मुद्यावर या संस्थांकडून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. ज्या वृक्षांच्या फांद्या छाटल्या जातात ते वृक्ष कमजोर असल्याने ते मृत होत आहेत अथवा धोकादायक अवस्थेत असल्याचा दावा याचिकेत केला आहे. तसेच महापालिका ही वृक्षतोड करण्याआधी कोणतीही पूर्वसूचना देत नाही. अथवा याबद्दल कोणतीही जनसुनावणीही घेत नसल्याचे याचिकेत नमुद करताना हा सर्व प्रकार हायकोर्टाने यासंदर्भात दिलेल्या आदेशांचा अवमान करणारा आहे असा आरोपही याचिकेत केला आहे.

केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गिते यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन अभीष्टचिंतन करताना राज्याचे पर्यावरणमंत्री रामदास कदम. सोबत युवा सेना नेते सिध्देश कदम, संजय कदम व इतर. (छाया: रवींद्र मोहिते)

मुलुंडच्या संभाजी राजे मैदानावरील मिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला स्थगिती कायम

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी) – खेळाच्या मैदानावर बांधकाम न करण्याचे पालिका आयुक्तांचे परिपत्रक असताना मुलुंडच्या संभाजी राजे मैदानावर कोट्यवधी रूपये खर्च करून मिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्याचा बृहन्मुंबई महापालिकेने घाट घातल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी आज केला. ॲड. बाळकृष्ण जोशी यांनी आयुक्तांनी काढलेले परिपत्रकच न्यायालयात सादर केले. याची गंभीर दखल न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठाने घेतली. न्यायालयाने मैदानावरील मिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला दिलेली स्थगिती कायम ठेवताना याचिकाकर्त्यांना चार दिवसात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देऊन याचिकेची पुढील सुनावणी ११ जूनपर्यंत तहकूब ठेवली.

या मैदानावर पालिकेने मिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्याचा घाट घातला. त्या विरोधात माजी आमदार शिशिर शिंदे आणि दोघा स्थानिक नागरिकांच्यावतीने ॲड. बाळकृष्ण जोशी यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. जोशी यांनी महापालिका आयुक्तांचे परिपत्रकच न्यायालयात सादर केले. मैदानावरील मिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी मैदानाचे जवळपास ६ हजार मीटर इतके क्षेत्र विकसित करण्याचा आराखडा प्रसिद्ध करून या आराखड्यात फूटबॉल ग्राऊंड, स्केटिंग, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल कोर्टस्चा अंतर्भाव यासह अतिरिक्त जॉगिंग ट्रॅकची उभारणी करण्याचाही घाट घातला. हा ठराव करण्यापूर्वी पालिका आयुक्तांनी मार्च २०१७ मध्ये परिपत्रक काढून खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर बांधकाम करण्यास मनाई केली होती. याची दखल न्यायालयाने घेऊन याचिकाकर्त्यांना पुरवणी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले.

महालक्ष्मी मंदिरात जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय दूर

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी)– 'बेस्ट'ची ७७ क्रमांकांची बस फेरी पुन्हा सुरू करण्यात आली आहे. 'बेस्ट' समिती अध्यक्ष आशिष चेंबूरकर यांच्या हस्ते या बसफेरीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिवसेना उपनेते भाई मिर्लेकर, उपनेते राजकुमार बाफना, बेस्ट समिती सदस्य राजेश कुसळे, समन्वयक अरविंद बने, शाखाप्रमुख प्रकाश मिसाळ, शाखा संघटक विजया शेलार, मुंबई सेंट्रल बसआगार प्रमुख शिरसाट आदी उपस्थित होते. बेस्ट'च्या ७७ क्रमांकाच्या बस ब्रीचकँडी हॉस्पिटल – महालक्ष्मी मंदिर – हाजी अली – महालक्ष्मी रेल्वे स्टेशन – सातरस्ता – केशवराव खाडये मार्ग – भायखळा स्टेशन – सुंदरगल्ली येथून पुन्हा महालक्ष्मी स्टेशन – हाजी अली – महालक्ष्मी मंदिर असा जलद प्रवास करणे शक्य होणार आहे.

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता

३ दिवसांत १६ श्वान मालकांना दंड

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी)– घरातील पाळीव प्राण्याला घेऊन फिरायला गेल्यानंतर ते सार्वजनिक ठिकाणे, रस्ते वा पदपथांवर घाण करतात. यामुळे सार्वजनिक ठिकाणे अस्वच्छ होत असल्याने पालिकेने श्वान मालकांवर नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. डी विभागात याकरिता ३२ निरीक्षक तैनात करण्यात आले असून त्यांनी तीन दिवसात १६ मालकांकडून दंड वसूल केला आहे.

महापालिकेच्या 'डी' विभागामध्ये ऑगस्ट क्रांती मैदान,गिरगाव चौपाटी, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, ग्रॅण्ट रोड, चर्नी रोड, ताडदेव, गोपाळराव देखमुख मार्ग (पेडर रोड), लक्ष्मीबाई जगमोहनदास मार्ग (नेपियन्सी रोड) इत्यादी महत्वाच्या ठिकाणांचा व परिसरांचा समावेश होतो. या परिसरात पाळीव प्राण्यांची संख्या देखील मोठी आहे.

तसेच पाळीव प्राण्यांसह सार्वजनिक ठिकाणी फिरायला येणा–यांची संख्या देखील मोठी आहे. पाळीव प्राण्यांद्वारे सार्वजनिक ठिकाणी घाण होत असल्याच्या काही तक्रारी महापालिकेच्या विभाग कार्यालयाद्वारे प्राप्त झाल्या होत्या.

या अनुषंगाने याबाबत विशेष जनजागृती मोहीम विभाग कार्यालयाद्वारे सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेसाठी ३२ निरीक्षकांचे पथक कार्यरत आहे.

हे निरीक्षक'डी' विभागातील विविध ठिकाणी फिरुन व पाहणी करुन पाळीव प्राण्यांच्या मालकांशी संवाद साधत आहेत.

यामध्ये प्रामुख्याने पाळीव प्राण्यांनी रस्त्यावर विष्ठा उत्सर्जित केल्यास अशी विष्ठा उचलण्यासाठी 'शिट लिफ्टर' हे उपकरण वापरुन विष्ठा कशी उचलावी व ती परिसरातील कच–याच्या डब्यात कशी टाकावी? याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले जात आहे. तसेच कुत्र्याने घाण केलेली असल्यास 'बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधी – २००६' नुसार प्रत्येकवेळी रुपये ५०० एवढा दंड देखील करण्यात येत आहे. यानुसार गेल्या ३ दिवसांत १६ व्यक्तींकडून प्रत्येकी ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती 'डी' विभागाचे सहाय्यक आयुक्त विश्वास मोटे यांनी दिली आहे.

सरकारला किंमत चुकवावी लागेल!

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी) – शेतकऱ्यांबाबत सरकारने कोडगेपणाचा कळस गाठला असून, सरकारला लवकरच याची मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशारा विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला आहे.

नागपूर येथील आंदोलनात झालेला एका शेतकऱ्याचा मृत्यू आणि अमरावती येथे तुरीचे पैसे मिळण्यासंदर्भात झालेल्या आक्रमक आंदोलनासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना ते बोलत होते. शेतकरी संपाचा एक भाग म्हणून नागपूर येथील प्रजापती चौकात आंदोलन करणारे शेतकरी शरद खेडीकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करताना विखे पाटील म्हणाले की, केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते आहे. त्यामुळे खेडीकर यांच्या मृत्युसाठी सर्वस्वी सरकारच जबाबदार आहे. मन की बात' मधून शेतकऱ्यांना डाळी पिकवण्याचे आवाहन करण्यात आले होते. या डाळीचा प्रत्येक दाणा खरेदी केला जाईल, असा शब्द खुद्द पंतप्रधानांनी दिला होता. पण शासकीय खरेदीची मुदत संपल्यावरही महाराष्ट्रात नाफेडकडे नोंदणी केलेल्या २ लाख ६५ हजार शेतकऱ्यांपैकी १ लाख ९२ हजार शेतकऱ्यांची सुमारे २५ लाख क्विंटल तूर अजूनही पडून आहे.

नालेसफाई १०० टक्के पूर्ण झाल्याचा पालिकेचा दावा

पाणी तुंबण्याचा धोका कायम

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी)– पावसाळ्यापूर्वी मुंबईतील नाल्यांच्या सफाईची १०० टक्के कामे पूर्ण झाल्याचा दावा पालिकेने केला आहे. मुंबईमध्ये एकूण ३,२८,४२५ मीटर लांबीचे नाले असून पावसाळ्यापूर्वी त्यातून पालिकेने सुमारे साडे तीन लाख घनमीटर गाळ उपसण्यात आल्याचा दावा केला आहे. मात्र प्रत्यक्षात मुंबईतील अनेक नाले कचरा आणि गाळाने तुडुंब भरले आहेत. त्यामुळे मुसळधार पावसात पालिकेचा दावा फोल ठरण्याची शक्यता आहे.

मुंबईत २००५ च्या महाप्रलयानंतर मोठ्या प्रमाणावर वित्त आणि जीवितहानी झाल्यानंतर पालिकेने पावसाळ्याआधी नाल्यातील गाळ काढण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

पावसापूर्वी ६० टक्के, पावसांत २० टक्के तसेच पावसानंतर २० टक्के नालेसफाई केली जाते. पावसापूर्वी मुंबईतील नालेसफाईच्या कामाला सुरुवात केली जाते. ३१ मे पर्यंत नालेसफाईची अंतिम मुदत होती. या मुदतीत ७० पैकी १०० टक्के नालेसफाई झाल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला आहे. मिठी नदीतील गाळही काढल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. मात्र मानखुर्दमधील लल्लूभाई नाला, अंधेरी पश्चिम येथील मोगरा नाला, मिठी नदी भागातील एअरपोर्ट नाला, अँटॉप हिल येथील नाला, वडाळा – कोरबा मिठानगर नाला, चमडावाला नाला हे मोठे नाले अद्याप गाळात असल्याची स्थिती आहे. त्यामुळे वरवरची नाले सफाई करुन दिखावा करण्यात आल्याने येथील रहिवाशांमध्ये संतापाच्या प्रतिक्रिया आहेत. काही वसाहती, रस्त्यांच्या बाजूच्या गटारांतील काढलेला गाळ अद्याप बाजूलाच पडून असल्याने पावसांत हा गाळ पुन्हा नाल्यात जाण्याची शक्यता आहे.

मुंबईतील नाले गाळातच रुतल्याची स्थिती आहे. १०० टक्के नाले सफाई कामांवर राष्ट्रवादीच्या पालिका गटनेत्या राखी जाधव यांनी आक्षेप घेत प्रशासनाचा दावा खोटा असल्याचा आरोप केला आहे.

पालिका निविदाप्रमाणे ६० पैकी १०० पावसाळापूर्व नालेसफाई मुदतीत पूर्ण झाली आहे. मिठी नदीतून ही गाळ काढला आहे.

मात्र जोपर्यंत पाऊस खऱ्या अर्थाने येत नाही, तोपर्यंत गाळ काढत राहू, असे पालिका पर्जन्य जलवाहिन्या प्रमुख अभियंता विद्याधर खणकर यांनी सांगितले.

राज ठाकरे व विनोद तावडे भेट

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी) – शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची कृष्णकुंज या त्यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली आहे. दोघांच्या भेटीचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे.

ठाण्यात होऊ घातलेल्या नाट्यसंमेलनाचे निमंत्रण देण्यासाठी विनोद तावडे गेल्याचीही चर्चा आहे.

यादरम्यान त्यांच्यात चर्चा झाल्याचीही माहिती आहे, पण नेमकी कोणत्या मुद्द्यांवर दोघांमध्ये चर्चा झाली याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. पण येत्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. मुंबई आणि कोकणातील शिक्षक–पदवीधर मतदारासंघाच्या निवडणुकीत शिवसेनेला शह देण्यासाठी भाजपने मोर्चेबांधणीला सुरुवात केल्याचेही म्हटले जात आहे.

आवाजाची मर्यादा ओलांडणाऱ्या मेट्रोवर कारवाई करणार का ?

उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला सवाल

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी) – राज्यात ध्वनी प्रदूषणा बाबतच्या अनेक तक्रारी असताना मुंबई मेट्रोच्या कामामुळे होणाऱ्या आवाजाच्या पातळीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणार का ? असा सवाल उच्च न्यायालयाने आज केला.

ध्वनी प्रदूषाच्या समस्येवर आवाज फाऊंडेशनच्यावतीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या खंडपीठा समोर सुनावणी झाली.

यावेळी ध्वनी प्रदुषण करणाऱ्या मेट्रोच्या कामाकडे राज्य सरकार कानाडोळा करत असल्याचे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले. न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या चर्चगेट, कफ परेड आणि माहीम येथील आवाजाची पातळी नोंदवली असून त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती राज्य सरकारने देताना मेट्रोच्या कामाच्यावेळी आवाजाची मर्यादा ओलांडली गेल्याचे मान्य केले.

त्याची दखल घेऊन न्यायालयाने दोषींवर कारवाई करणार का असा प्रश्न उपस्थित करून याचिकेची सुनावणी १९ जूनपर्यंत तहकूब ठेवली.

SBI

पीएफएसबीयू, वोल्टास हाउस, बेलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई – 400 001

छत्तीसगडमध्ये 600 एमडब्ल्यू इन्स्टॉल्ड क्षमता असलेल्या पावर प्रोजेक्ट चालवणाऱ्या कंपनीमध्ये किमान 51% मालकी प्राप्त करण्यासाठी इच्छुकता व्यक्त करण्याकरिता आमंत्रण

छत्तीसगड राज्यामध्ये बिंजकोट आणि दुरामुडा गावात, रायगड येथे प्रत्येकी 600 एमडब्ल्यूचे दोन फेजेस असलेला 1200 एमडब्ल्यू (4x300 एमडब्ल्यू) डोमेस्टिक कोल आधारित थर्मल पावर प्रोजेक्ट राबवण्यासाठी कंपनीने (XYZ Ltd.) छत्तीसगड सरकारशी एमओयू करारबध्द केला आहे **('प्रकल्प' किंवा' दि कंपनी')**. एकूण 1200 एमडब्ल्यूपैकी, 600 एमडब्ल्यू (2x300 एमडब्ल्यू) क्षमतेचा पहीला फेज चालू झाला आहे. त्याच्या पहील्या फेजच्या यूनिट I (300 एमडब्ल्यू) ने ऑक्टोबर 6, 2017 ह्या तारखेला कमर्शिअल ऑपरेशन **('सीओडी')** आणि यूनिट II (300 एमडब्ल्यू) ने एप्रिल 01, 2018 ला कमर्शियल ऑपरेशनची सुरुवात केली आहे.

भारतीय स्टेट बँकेने ('एसबीआय') कर्जदात्यांच्या चमूसह कंपनीच्या प्लेज केलेल्या समभागांवर ट्रान्सफर करण्याची मागणी केली आहे आणि नवीन गुंतवणूकदार/गुंतवणूकदारांचा संघ ह्यांना किमान 51% इक्विटी शेअरहोल्डिंग (संपूर्णपणे डायल्युटिव आधारावर) हस्तांतरित करून मालकी आणि व्यवस्थापन नियंत्रणात बदल आणण्याचे ठरवले आहे.

एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड **('एसबीआयकॅप')** भारतीय स्टेट बँकेच्या ('एसबीआय') जनादेशानुसार (कंपनीच्या कर्जदात्यांच्या चमूच्या वतीने कृती करत आहे) कर्जदात्यांना किमान 51% इक्विटी शेअरहोल्डिंग (संपूर्णपणे डायल्युटिव आधारावर) प्राप्त करण्यासाठी आणि कंपनीमध्ये मालकी आणि व्यवस्थापन नियंत्रणात बदल घडवण्यासाठी, गुंतवणूकदार/गुंतवणूकदारांचा संघ ओळखण्याकरिता मदत करत आहे.

एसबीआय, एसबीआयकॅप सोबत पुरेशी आर्थिक आणि तांत्रिक क्षमता **('इच्छुक पक्षकार')** असलेल्या गुंतवणूकदार/गुंतवणूकदारांचा चमू ह्यांच्याकडून इच्छुकतेची व्यक्तता आमंत्रित करत आहे **('ईओआय')**, जी कंपनीच्या कर्जदात्यांकडून त्यांच्या इच्छेप्रमाणे कंपनीच्या मालकी आणि व्यवस्थापन नियंत्रणातील बदलासाठी स्वीकारली जाऊ शकते.

इच्छुक पक्षकार एसबीआय आणि एसबीआयकॅपच्या इथे दिलेल्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या फॉरमॅटनुसार त्यांचा ईओआय जून 11, 2018 रोजी सायं 5.00 पर्यंत **('सादर करण्याची तारीख')** सादर करू शकतात, आणि तोच rajrajeswari.mishra@sbicaps.com यांना ईमेलद्वारे पाठवू शकतात आणि ईओआयची एक हार्डकॉपी खाली दिलेल्या पत्त्यावर सादर करण्याच्या तारखेच्या 5 (पाच) कामकाजाच्या दिवसात हाताने पाठवून, पोस्ट किंवा कुरियर करून (इच्छुक पक्षकारांच्या जोखीमेवर आणि खर्चाने) मोहोरबंद लिफाफ्यावर खालील वाक्य लिहून पाठवू शकतात.

''XYZ लिमिटेडची मालकी आणि व्यवस्थापन नियंत्रण प्राप्त करण्यासाठी इच्छा असलेली व्यक्तता''

कृपया नोंद घ्यावी: प्रति, श्रीमती राजराजेश्वरी मिश्रा, वाइस प्रेसिडंट, एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, 202, मेकर टॉवर ई, कफ परेड, मुंबई 400 005.

इच्छुक बोलीधारकांनी कंपनीच्या माहितीसाठी एसबीआय आणि एसबीआयकॅपच्या (www.sbi.co.in आणि www.sbicaps.com) ह्या वेबसाइट्सवर अपलोड केलेल्या ईओआय कागदपत्रांचा (कंपनी टीजरसह) संदर्भ घ्यावा.

कोणत्याही स्पष्टीकरणासाठी कृपया खाली दिलेल्यांना संपर्क करा:

संपर्क करायची व्यक्ती	टेलिफोन नंबर	ई–मेल आयडी
श्री. भवानी शंकरन (एजीएम, एसबीआय)	+91 22 2268 6916	teamlead10.pfsbu@sbi.co.in
श्रीमती राजराजेश्वरी मिश्रा (व्हीपी, एसबीआयकॅप)	+91 22 2217 8313	rajrajeswari.mishra@sbicaps.com

टीप: कर्जदाते/एसबीआयकॅप ह्यांनी कोणतेही कारण न देता आणि कोणतही दायित्व न पाळता, कार्यवाही रद्द करण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा आणि/किंवा कोणत्याही इच्छुक पक्षकाराला अपात्र ठरवण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. हे ऑफर कागदपत्र नाही आणि ह्याचा ऑफर असा अर्थ लावू नये. जर असेल तर, स्पष्टीकरण/बदल/वेळेचा विस्तार पाहण्यासाठी अर्जदारांनी वरील (एक/अनेक) वेबसाइटला नियमितपणे भेट देऊन अद्ययावत राहावे. संपूर्ण अस्वीकृतीसाठी वरील वेबसाइट पहा.

स्थळ: मुंबई
दिनांक: 05-06-2018

बारवी प्रकल्पबाधितांना मूलभूत सुविधा द्या – सुभाष देसाई

मुंबई, सोमवार (प्रतिनिधी) – प्रशासनाने बारवी प्रकल्पबाधितांना पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरवाव्यात तसेच पुनर्वसनाचे काम कालबध्द पध्दतीने करुन याबाबतचा अहवाल तातडीने सादर करावा, असे आदेश उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी आज दिले. बारवी धरणाच्या पाण्याखाली गेलेल्या जमिनी तसेच घरांच्या पुन:मुल्यांकनावर चर्चा करण्यासाठी मंत्रालयातील सातव्या मजल्यावर प्रकल्पबाधित व अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

प्रशासनाने पुन्हा एकदा प्रकल्पबाधित भागाला भेट देऊन नागरिकांच्या सूचना व हरकती ऐकून घेऊन त्यावर तात्काळ मार्ग काढण्याचे देसाई यांनी यावेळी सांगितले. ते पुढे म्हणाले, येत्या काही दिवसात पावसाला सुरुवात होणार आहे. प्रकल्पबाधित कुटुंबियांना कुठल्याही प्रकारे त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी, पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करून त्यात अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच पुन:मुल्यांकनाची प्रक्रिया तात्काळ राबवून बाधितांना एमआयडीसीने नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन
http://mahenvis.nic.in

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
http://mpcb.gov.in

जागतिक पर्यावरण दिन

प्लास्टीक पिशवी आणि थर्माकोल मुक्त महाराष्ट्र
जनजागृती अभियान २०१८

एकच ध्यास ठेवूया, प्लास्टीक पिशवी हटवूया, समृद्ध पर्यावरणाचे रक्षण करुया!

प्लास्टीक बंदी ही भविष्यातील पर्यावरण रक्षणाकरिता वर्तमानाची जबाबदारी आहे. यातील आपला सहभाग ही पर्यावरण संवर्धनाची नांदी आहे.
मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

राज्यामध्ये घेतलेला प्लास्टीक बंदीचा निर्णय हा ऐतिहासिक आहे. आपण सगळे मनापासून निश्चय करुया, प्लास्टीक पिशवी व सजावटीत थर्माकोलला हद्दपार करुया.
मा. ना. श्री. रामदास कदम
मंत्री, पर्यावरण

प्लास्टीक बंदीमुळे पर्यावरणाचे रक्षण होणार असून भविष्यातील पिढीला निसर्ग संवर्धनाचा वसा आपण बहाल करणार आहोत. प्लास्टीक बंदी ही सामाजिक चळवळ करुया.
मा. ना. श्री. प्रवीण पोटे पाटील
राज्यमंत्री, पर्यावरण

प्लास्टीक बंदी कशावर?

थर्माकोल व प्लास्टीक पासून बनविण्यात येणाऱ्या ताट, कप्स, ग्लास, काटे, वाटी, चमचे, भांडे इत्यादी डिस्पोजबल वस्तु.

हॉटेल्समध्ये अन्नपदार्थ पॅकेजींगसाठी वापरले जाणारे प्लास्टीकचे भांडे, वाटी व स्ट्रॉ.

प्लास्टीक व थर्माकोलचा वापर सजावटीसाठी बंदी असेल.

नॉन वोवन पॉलिप्रॉपीलीन बॅग्ज् या पर्यावरणस्नेही नाहीत, प्लास्टीक बंदी अंतर्गत या बॅगवर ही बंदी आहे.

कापडी पिशवी हीच प्लास्टिक पिशवीला उत्तम पर्याय आहे.

गुन्हा केल्यास दंड : पहिला गुन्हा रु. ५००० दंड • दुसरा गुन्हा रु. १०००० दंड • तिसरा गुन्हा रु. २५००० दंड + ३ महिने कारावास

प्लास्टीक व थर्माकोल बंदी बाबत अधिक माहितीसाठी https://dgps.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अधिसूचना उपलब्ध आहे.